# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

**Pune metropolitan Region Development Authority, Pune**

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे- ४११०४४

PUNEMETROPOLIS

New Administrative Building, Near Akurdi Railway Station, Akurdi, Pune-411044

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email: comm@pmrda.gov.in


## एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नुसार
## सुधारित विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र

(मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. २.६ नुसार)

जा.क्र. : DP/बीएचए/मौ. वाघोली/स.नं. १२८७/२/प्र.क्र. १०२६/२४-२५/३७९४ दि.१६/०७/२०२४

प्रति,

श्री.अनुज उमेश गोयल व इतर

रा. मौजे - वाघोली, ता. हवेली, जि.पुणे.

मौजे- वाघोली, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे येथील स.नं. १२८७/२ मधील मंजूर रेखांकनातील प्लॉट नं. "अ", क्षेत्र - ६१५५०.०० चौ.मी. क्षेत्रावर **"समुह गृहबांधणी"** प्रकल्पातील रहिवास व वाणिज्य रेखांकन /इमारत सुधारित बांधकाम प्रस्ताव मंजूरीस्तव प्राधिकरणाकडे प्राप्त झाला आहे. आपण प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रास अधिन राहून तसेच सोबतच्या परिशिष्ट ' अ ' मध्ये नमूद अटी व शर्तीस अधिन राहून उक्त प्रस्तावास विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(भाग्यश्री ढवळसंक)
उपमहानगर नियोजनकार
विकास परवानगी विभाग,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

( मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्येतेने )

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune
PMRDA

मौजे- वाघोली, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे येथील स.नं. १२८७/२ मधील मंजूर रेखांकनातील प्लॉट नं. "अ", क्षेत्र - ६१५५०.०० चौ.मी. क्षेत्रावर **"समुह गृहबांधणी"** प्रकल्पातील रहिवास व वाणिज्य रेखांकन /इमारत सुधारित बांधकाम प्रस्ताव

---

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि- / /२०२४, रोजीचे पत्र क्र. १०२६/२४-२५ सोबतचे परिशिष्ट 'अ'**

१) सुधारित मंजूर नकाशाप्रमाणेच जागेचा विकास व बांधकाम करणे बंधनकारक राहील.

२) सदर विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र दिल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत बांधकाम्‍ सुरु करणे बंधनकारक राहील. बांधकाम सुरु केल्याबाबत प्राधिकरणाला त्याप्रमाणे कळविणेत यावे. तद्नंतर त्यापुढे आवश्यकतेनुसार विहीत मुदतीमध्ये सदर परवानगी व प्रमाणपत्राचे नुतनीकरण करुन न घेतल्यास सदरचे परवानगी व प्रमाणपत्र संपुष्टात येईल.

३) मा.जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा) यांचेकडील आदेश जा.क्र. PRH/PMRDA/NA/SR/६७/२०२१, दि. ११/०३/ २०२२ या पत्रातील जमिनीचा वर्ग, तिचा भोवगटा, तिचा धारणाधिकार, अकृषीक आकारणी आणि ती वरील भार याबाबत पत्रा मधील अटी व शर्ती अर्जदार /विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

४) प्रस्तावासोबत मोजणी अतितातडी.बि.शेती.मो.र.नं.२३५५४/२०२३, दि.२१/१०/२०२३ ने केलेल्या वहीवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे तसेच जागेच्या मालकी / वहिवाटीबाबत अर्जदाराने /विकासकाने/ जमीनमालकाने याबाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचे अधिन राहून परवानगी देण्यात येत आहे. सदर जमिनीचे वहीवाटीचे/ हद्दीचे अनुषंगाने अथवा इमारतीबाबत कोणतेही व्यक्तिगत वाद/ न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार / विकासक / जमिनमालक यांची राहील. ज्या जागेची मालकी / वहिवाट, अर्जदार /विकासक / जमिनमालक यांची नाही अशा कोणत्याही जमिनीवर सदर परवानगीव्दारे विकास अनुज्ञेय राहणार नाही.

५) प्रस्तुतच्या जमिनीवर आर्थिक संस्थाचा बोजा असल्यास त्यास अर्जदार / जमीनमालक /विकासक सर्वस्वी जबाबदार राहतील.

६) नागरी जमीन (कमाल धारणा व विनियम) अधिनियम,१९७६ हा निरसित झाला असल्याने या अधिनियमांतर्गत बाबींकरिता प्रस्तावासोबत आपण रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील दिनांक ३०/१०/२०२३ रोजी नोटरी ममता के. शाह यांचेसमोर केलेले विहीत नमुन्यातील शपथपत्र व बंधपत्र नोटराईज्ड क्र. २००११/२०२३ सादर केले आहे. सदर शपथपत्र व बंधपत्रास अधिन राहून सदर बांधकाम परवानगी देण्यात येत आहे. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार /जमीनमालक /विकासक यांची राहील सदर शपथपत्र व बंधपत्रातील माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास झालेले बांधकाम अनधिकृत समजून कारवाईस पात्र राहील.

७) विषयांकित जमिनीवर कोणतेही विकास कार्य सुरु करण्यापूर्वी रेखांकन जागेवर सिमांकित करुन भूमि अभिलेख खात्याकडून प्रमाणित करुन घेणे बंधनकारक आहे. मंजूर रेखांकनानुसार जागेवरील सिमांकन झाल्यानंतर, भूखंडाचे क्षेत्रफळ, रस्त्याची रुंदी, १०% खुली जागा, १५% सुविधा क्षेत्र मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. यामध्ये कोणताही बदल झाल्यास रेखांकन पुन्हा मंजूर करुन घेणे बंधनकारक राहील. अशा प्रमाणित रेखांकनाची प्रत प्राधिकरणास सादर करुन त्यास अंतिम मंजूरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करता येणार नाही.

Metropolitan Regional Development Authority PMRDA Pune

८) मंजूर नकाशात दर्शविलेप्रमाणे नियोजित बांधकामापासुन पुढील, मागील व बाजुची सामासिक अंतरे प्रत्यक्षात जागेवर कायम व खुली ठेवणे आवश्यक राहील.

९) रेखांकनातील भूखंड व नियोजित इमारतीचा वापर फक्त मंजूर नकाशानुसार **"रहिवास व वाणिज्य"** याप्रमाणे अनुज्ञेय केलेल्या वापरासाठी करणे बंधनकारक राहील. इमारतीच्या वापरात बदल करावयाचा असल्यास त्यास प्राधिकरणाची पूर्वमंजूरी घ्यावी लागेल.

१०) अभिन्यासातील रस्ते यांची देखभाल व अभिन्यासामध्ये दर्शविलेले वर्गीकृत /प्रादेशिक योजना रस्ते/ रस्ता रुंदीकरणातील क्षेत्र सर्व जनतेच्या वापरासाठी तसेच शेजारच्या जमीनमालकास वापरण्यास खुले ठेवणे बंधनकारक राहील.

११) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांने/ विकासकांने /जमीनमालकाने भुखंड/सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

१२) नियोजित बांधकामातील मजल्यांची संख्या व उंची,मंजूर रेखांकन/बांधकाम नकाशांवर दर्शविल्यापेक्षा जास्त असता कामा नये.

१३) नियोजित बांधकामाचे क्षेत्र, भुखंडावर अन्य बांधकाम अस्तित्वात असल्यास त्यासह एकुण बांधकाम क्षेत्र, सुविधा क्षेत्र व प्रादेशिक योजना रस्ते / रस्तारुंदी क्षेत्र नकाशावर दर्शविलेनुसार प्रत्यक्ष जागेवर असणे आवश्यक आहे.

१४) जागेतील/ जागेलगतच्या नाल्याच्या/ नदीच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा येईल, असे कोणतेही बांधकाम करता येणार नाही. त्याचप्रमाणे उक्त जमिनीवरील विकास करताना जागेवरील भूपृष्ठ रचनेमध्ये अनाधिकृत बदल करता येणार नाहीत. सदर अटीचा भंग करुन विकास केल्याने दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांची राहील.

१५) स्टिल्ट भविष्यात बंदिस्त करण्यात येऊ नये, तसेच स्टिल्टचा वापर फक्त पार्किंगसाठीच करण्यात यावा.

१६) स्ट्रक्चरल इंजिनिअर / डिझायनर यांनी तयार केलेल्या Structural Design नुसार प्रत्यक्ष जागेवर विकास करणेची जबाबदारी विकासक व सुपरवायझर यांची संयुक्तिक राहील.

१७) अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांनी रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवरील नोटराईज्ड **क्र. ७५४२/२०२४, दिनांक- ०४/०६/२०२४ रोजी नोटरी ममता के. शाह** यांचेसमोर केलेले विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. सदर शपथपत्रास अधिन राहुन ही परवानगी देण्यात येते असुन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी सुधारित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील सर्व नियम आणि भारतीय मानक ब्युरोने विहित केलेल्या सुरक्षा प्रमाणकांचे पालन करणे अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.( नियम क्र. ७.१ )

१८) शासन नगर विकास विभागाकडील दि.१९/११/२००८ चे निदेश क्र. टिपीव्ही-४३०८/४१०२/ प्र.क्र. ३५९/०८/ नवि-११ नुसार अर्जदार / विकासक/ जमिनमालक व वास्तुविशारद यांनी बांधकाम नकाशामध्ये प्रत्येक "रहिवास व वाणिज्य" इमारतीकरिता एकूण बांधकाम क्षेत्र (Built up area) नमूद केलेले आहे. सदर नमूद

बांधकाम क्षेत्रा (Built up area) बाबत आकडेमाडे, गणितीय चुका इ. बाबत वास्तुविशारद व अर्जदार / विकासक/ जमिनमालक संयुक्तिकरित्या जबाबदार राहतील.

१९) नियोजित इमारतीसाठी/ विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पिण्याच्या पाण्याची सोय आपण अश्वासित केलेल्या सक्षम प्राधिकरणाने/ ग्रामपंचायतीने न केल्यास पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता अर्जदार / विकासक / जमिन मालक यांनी स्वखर्चाने प्रत्यक्ष वापरापुर्वी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची सुयोग्य व्यवस्था प्रत्यक्ष वापरापुर्वी करणे बंधनकारक राहील.

२०) ओला व सुक्या कचऱ्याकरिता सदर जागेत स्वतंत्र कंटेनरची सोय करणे आवश्यक राहील. विघटन होणाऱ्या ओल्या कचऱ्यासाठी गांडळूखत प्रकल्प अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांनी स्वखर्चाने करावयाचा आहे.

२१) सदर जमिनीचे क्षेत्रफळ ५०० चौ.मी. पेक्षा जास्त आहे. त्यामुळे प्रत्येक ८० चौ.मी. क्षेत्रासाठी एक झाड याप्रमाणे वृक्ष लागवड करणे व त्याची जोपासणा करणे अर्जदार/विकासक /जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

२२) शासन निदेशानुसार बांधकाम करताना फ्लॅय अॅशचा वापर करणे बंधनकारक राहील.

२३) सौर उर्जेची यंत्रणा अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांनी इमारतीचे वापरापुर्वी स्वखर्चाने करावयाची आहे.

२४) वेस्ट वॉटर ट्रिटमेंट प्लँट उभारणे अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधकनकारक असुन पाण्याचा फेरवापर बगीचा, झाडाची जोपासणा यासाठी करणे आवश्यक आहे.

२५) प्रस्तुत प्रस्तावामध्ये अर्जदार यांनी दि. ०५/०९/२०२३ रोजीच्या सुधारित परवानगीवेळी नोटराईज्ड् हमीपत्र सोबत जोडलेले आहे. तसेच हमीपत्र मध्ये नमूद केलेप्रमाणे पाणी पुरवठा बाबत अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांनी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

२६) अर्जदारामार्फत दि. ०५/०९/२०२३ रोजीच्या मंजूरीवेळी क्षतीपत्र (जमिनीवर न्यायालयीन /इतर वाद नसलेबाबत व जमिन भुसंपादनाने बाधीत नसले बाबत) नोटराईज्ड् क्र. २००१३/२०२३ दि. ३०/१०/२०२३, अन्वये क्षतीपत्र सोबत जोडलेले आहे. तसेच प्रतिज्ञापत्र दि. ०४/०६/२०२४, ममता के. शाह यांचेमार्फत नोटराईज्ड् क्र. ७५४३/२०२४ अन्वये प्रतिज्ञापत्र नमूद केलेप्रमाणे अर्जदार/ विकसक यांचेवर बंधनकारक राहतील.

२७) रेन वॉटर हार्वेस्टिंग बाबतची यंत्रणा अर्जदार यांनी स्वखर्चाने करावयाची आहे.

२८) प्रारंभ प्रमाणपत्र दिलेल्या कोणत्याही इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर मंजुर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. ७.५ नुसार पुर्णत्वाचे अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांनी सादर करुन नियम क्र. ७.६ नुसार भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्याखेरीज कोणत्याही इमारतीचा भागश: / पुर्णत: वापर सुरु केल्यास अर्जदार/ विकासक/ जमिनमालक कारवाईस पात्र राहील.

२९) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूद क्र.६.२.६.१ नुसार विशेष इमारतीबाबत:-

a) प्रमाणित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुद क्र. १४.६(b) नुसार प्रस्तावित इमारती सभोवताली ६.०० मी रुंदीचे पाथवे किमान ४५ टन वजनाचे फायर इंजिनचा भार पेलु शकेल या प्रमाणे डिझाईन करुन विकसीत करणे अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक आहे.



Pune Metropolitan Region Development Authority, Pune
PMRDA

b) अर्जदार/ विकासक/ जमिनमालक यांनी प्रस्ताविल्यानुसार सर्व उंच इमारती स्टिल्ट वर असणे आवश्यक राहील त्याचबरोबर वाहनतळ सुविधा प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुद क्र. १८.१४ नुसार प्रस्तावित करणे आवश्यक राहील.

c) प्रस्तावित उंच इमारतीचे नियोजनानुषंगाने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी पत्र क्र. FPH/71/2024-25, दि- 02/05/2024 ने दिलेल्या Revised Provisional Fire NOC मधील अटीं/ शर्तीची पूर्तता करणे अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

d) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूद क्र. ६.२.६.१ नुसार बाबींची पूर्तता तसेच अग्निप्रतिबंधक उपाययोजनाबाबत भाग-४ मधील बाबींची पुर्तता करणे अर्जदार / विकासक/ जमिनमालक बंधनकारक राहील.

e) नेहमीच्या वापरासाठीच्या पाणी पुरवठयाशिवाय अग्निप्रतिबंधक व्यवस्थेकरीता, पाणीपुरवठा बाबतची पुर्तता अर्जदार /विकासक/ जमिनमालक यांनी स्वखर्चाने, स्वजबाबदारीवर करणे आवश्यक राहील.

f) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील तरतूद क्र.१८ नुसार लिफ्टची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

g) अशा इमारतींचे Structural Design हे भुकंप प्रतिबंधक असणे आवश्यक राहील. अर्जदाराने / विकासकाने/ जमिनमालकाने इमारतीचे Structural Stability बाबत नोंदणीकृत Structural Engineer चे प्रमाणपत्र संबंधित अग्निशमन अधिकारी यांचेकडे व या प्राधिकरणाकडे दाखल करणे आवश्यक राहील.

h) भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी सर्व अग्निशमन यंत्रणा व सुविधांची पुर्तता करुन सदर यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वित असलेबाबत अग्निशमन विभागाकडील अंतिम नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे अर्जदार / विकासक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

i) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी पत्र क्र. FPH/71/2024-25, दि- 02/05/2024 ने दिलेल्या Revised Provisional Fire NOC ही काही अटी व शर्तीस अधिन राहून दिलेली आहे. सदरचे नाहरकत प्रमाणपत्र देताना सादर केलेल्या व प्रस्तावित केलेल्या नकाशामध्ये फेरबदल झाल्यास अशा नियोजनास संबंधित मुख्य अग्शिमन अधिकारी/ संचालक यांचे सुधारित ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

३०) विषयांकित प्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेले एकूण प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (Gross FSI+ Non FSI ) २८२०००.०० चौ.मी.आहे. त्यामुळे या प्रकल्पास पर्यावरण विभागाकडील State Environmental Impact Assessment Authority कडून Environment Clearance प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्यानुसार अर्जदार /विकासक / जमीनमालक यांनी यापूर्वी पर्यावरण विभागाकडील पत्र क्र. SIA/MH/Infra2/444165/2023, दि. ०८/०२/२०२४ अन्वये प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. सदर प्रमाणपत्रामध्ये एकूण (Gross FSI+ Non FSI) १४९२३३.२२ चौ.मी. बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय करण्यात आले आहे. सदर Environment Clearance प्रमाणपत्रातील अटी व शर्ती अर्जदार/विकसक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहील. तसेच पर्यावरण विभागा कडील परिपत्रक क्र. SEIAA 2014/LR-02/TL-3, दि.

Pune Metropolitan Regional Development Authority, Pune PMRDA

३०/०१/२०१४ मधील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करणे प्रकल्पाचे अर्जदार /विकासक / जमीनमालक व वास्तुविशारद यांचेवर बंधनकारक राहील.

३१) केंद्र शासनाच्या Ministry Of Civil Aviation ची अधिसूचना क्र. G.S.R. ७५१ (E) दि. ३०/०५/२०१५ अन्वये इमारतीच्या उंचीवर बंधने घालण्यात आलेली आहेत. AVIATION विभागाच्या COLOUR CODED ZONING MAP नुसार प्रस्तावाखालील जागा P९ झोन मध्ये समाविष्ट आहे. सदर नकाशानुसार कमीत कमी अनुज्ञेय उंचीचा विचार करता महत्तम अनुज्ञेय होणारी उंची ५८६.०० मी. इतकी आहे. तसेच कार्यालयात उपलब्ध असलेला अभिलेखातील नकाशानुसार विषयांकित जागेचे AMSL ५५४.५० मी. आहे. प्रस्तावित बांधकाम नकाशांमध्ये सर्वात उंच इमारतीची टॉप लेवलची उंची – ९२.५० मी. + ५५४.५० मी. = ६४७.०० मी. इतकी येते. त्यामुळे नकाशाप्रमाणे AVIATION विभागाकडील ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने अर्जदाराने Directorate of Ops (ATS) Air Headquarters Vayu Bhawan, Rafi Marg, New Delhi - 110011 यांचेकडील जा.क्र. Air HQ/S 17726/01/ATS (PC-MMMCCCLII), दि. २०/०१/२०२३ अन्वये ८७.३१ मी AGL/६४७ मी. AMSL उंची करिता नाहरकत प्रमाणपत्र सादर केलेले आहे. सदर नाहरकत प्रमाणपत्रातील अटी व शर्ती अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३२) सदर प्रकरणी अँड सविता प्रदीपकुमार रेकाडे यांचेकडील दि. ०३/०५/२०२३ रोजीच्या सादर नोटराईजड + Consent Letter अन्वये प्रस्तावित २४.०० मी रुंद रस्त्यानुषंगाने विषयांकित गट नं १२८७ /२ या जागेवर मंजूरीनुसार प्रत्यक्षात विकासकामे सुरु करणेपूर्वी स.नं १२८७, १२८८, १२८९, १२९० १३०१ मधून सदर जागेच्या उत्तर-दक्षिणेकडील विद्यमान रस्त्यापासून, प्रादेशिक योजना व विकास योजना आराखडयामध्ये प्रस्तावित केल्यानुसार २४.०० मी रुंदीचा रस्ता प्रत्यक्षात जागेवर स्वखर्चाने उपलब्ध करून देणे अर्जदार/विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

३३) एकात्मिकृत विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ३.८.२ मध्ये नमूद केल्यानुसार Inclusive housing अंतर्गत येणाऱ्या सदनिकांचे बांधकाम पूर्ण झाल्याशिवाय इतर कोणत्याही इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होणार नाही, याची अर्जदार/ विकासक / जमिन मालक/ वास्तुविशारद यांनी नोंद घेणे.

३४) सदर प्रकरणी विषयांकित जागेबाबत अनेक न्यायालयीन दावे न्यायाधिन असून अर्जदार यांनी सादर केलेल्या दि. २४/०२/२०२३ रोजीच्या नोटराईज्ड हमीपत्रान्वये सदर न्यायालयीन दाव्यानुषंगाने जो काही अंतिम निर्णय होईल तो अर्जदार/विकासक यांचेवर बंधनकारक राहील व त्याची प्राधिकरणास तोषिस लागू देणार नाही.

३५) प्रकरणी भोगवटा प्रमाणपत्र घेणेपूर्वी Green Building अनुषंगाने Final Certificate घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३६) विषयांकीत भूखंडाच्या मूळ मंजूर रेखांकन नकाशानुसार सदर भूखंडाचा स्वतंत्र ७/१२ उतारा प्रकरणी भोगवटा प्रमाणपत्र घेणेपूर्वी सादर करणे अर्जदार/ विकसक/ जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

Pune Metropolitan Regional Development Authority PMRDA Pune

३७) रेखांकन/ बांधकाम नकाशामध्ये २४.०० मी. रुंद प्रादेशिक योजना / प्रारूप विकास योजना रस्ता मा. महानगर आयुक्त यांचे मान्यतेने Inlet/Outlet मध्ये बदल न करता सदर जागेच्या उत्तर हद्दीवर स्थलांतरित करण्यात आलेला आहे.

३८) UDCPR मधील विनियम क्र. २.२.१४ मधील तरतूदीनुसार Add. प्रिमीयम शुल्क एकूण र.रु. ५,५७,२१,१७०/- रक्कमेच्या १००% भरणा केलेला आहे.

३९) UDCPR मधील विनियम क्र. २.२.१४ मधील तरतूदीनुसार Ancillary FSI शुल्क एकूण र.रु. ४,७९,०३,०६०/- रक्कमेच्या १००% भरणा केलेला आहे.

४०) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शूल्क, प्रिमीयम शूल्क, विकास शूल्क, वाढीव विकास शुल्क, कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

४१) अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची/दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

प्रस्तावासोबतच्या रेखांकन/बांधकाम नकाशांचे दोन संच स्वाक्षांकित करुन सोबत जोडले असून प्रस्वातावासोबतची अन्य सर्व कागदपत्रे प्राधिकरणाच्या अभिलेखार्थ राखून ठेवण्यात येत आहेत.

(भाग्यश्री ढवळसंक)
उपमहानगर नियोजनकार
विकास परवानगी विभाग,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

( मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्येतेने )

Pune Metropolitan Regional Development Authority Pune
PMRDA